विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, अमरावती विकास -आस्थापना विभाग
बायपास रोड, कॅम्प, अमरावती - 444 602
दुरध्वनी 0721-2662293 फॅक्स 0721-2662782
**ईमेल** : dycomm.amt@gmail.com **वेबसाईट** : http://amravatidivision.gov.in

क्र.विकास/आस्था/मविसे/कावि-९७६/ ०२२ दि.१६ डिसेंबर, २०२२

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,अमरावती/अकोला/यवतमाळ/बुलडाणा/वाशिम.

विषय :- महाराष्ट्र विकास सेवा गट-ब मध्ये पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या जिल्हा सेवा,जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ च्या कर्मचा-यांची विभागीय स्तरावरील दिनांक १.१.२०२२ ची तात्पुरती सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करण्याबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्रमांक विकास/आस्था/मविसे/ता.से.या/कावि-८१६/२०२२ दि.१८ नोव्हेंबर,२०२२

महाराष्ट्र विकास सेवा गट-ब मध्ये पदोन्नती देण्याकरिता जिल्हा व तांत्रिक सेवा वर्ग-३ च्या कर्मचा-यांची आठ संवर्गातील (पंचायत/कृषि भाग-१ व भाग-२/लिपीक/सांख्यिकी/शिक्षण/आरोग्य) तुर्तास पशुसंवर्धन संवर्ग वगळुन सन २०२१ ची तात्पुरती सेवा जेष्ठता यादी तयार करण्याकरिता आपणाकडून संदर्भ पत्रानुसार माहिती मागविण्यात आली होती. प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने तात्पुरती सेवा जेष्ठता यादया तयार करण्यात आल्या असून सदर यादया जिल्हा स्तरावर प्रसिध्द करण्याकरिता यासोबत पाठविण्यात येत आहे. तसेच तात्पुरत्या जेष्ठता यादीच्या अनुषंगाने संबंधित कर्मचारी यांचे आक्षेप/हरकती आपल्या स्तरावर प्राप्त करुन घेऊन आपल्या अभिप्रायासह दिनांक २९.१२.२०२२ पर्यंत संबंधित विभागाचे क.प्र.अ./स.प्र.अ.यांना या कार्यालयास सादर करण्याबाबत निर्देशित करावे.

दिनांक २९.१२.२०२२ नंतर प्राप्त होणा-या आक्षेप/हरकतीचा विचार केला जाणार नाही व तात्पुरत्या जेष्ठता यादया अंतिम करण्यात येईल. यांची सर्वस्वी जबाबदार संबंधित विभाग प्रमुखाची राहल. तसेच संबंधित कर्मचारी यांनी परस्पपर आक्षेप/हरकती या कार्यालयास सादर करुन नये याबाबत सुध्दा संबंधित कर्मचारी यांना कळवावे.

टिप :- १.तात्पुरत्या सेवा जेष्ठता यादीमध्ये (संवर्गनिहाय) अभिप्राय रकान्यामध्ये व इतर रकान्यामध्ये नमुद केलेली माहिती आक्षेप हरकती सोबत या कार्यालयास सादर करावी.
२.आरोग्य पर्यवेक्षक या संवर्गाबाबत अभिप्राय रकान्यामध्ये दिलेल्या निर्देशानुसार काटेकारपणे अंमलबजावणी करण्यात यावी, तसेच सदर सवंर्गाच्या यादीमध्ये दिलेल्या टिप बाबत संबंधित कर्मचारी यांना कळविण्यात यावे. व तसा अहवाल आक्षेप/हरकती सोबत सादर करावा.
३) सोबत जोडलेल्या दिव्यांग कर्मचा-यांच्या जेष्ठतेयादीबाबत आक्षेप/हरकती तसेच दिव्यांग प्रमाणपत्र ऑनलाईन व ऑफलाईन प्रमाणपत्र सादर करावे.

सहपत्र :- १) २०२२ ची तात्पुरती सेवा सेवा जेष्ठता यादी
(पंचायत/कृषि भाग-१ व भाग-२/लिपीक/सांख्यिकी/शिक्षण/आरोग्य)
२) दिव्यांग कर्मचा-यांची एकत्रित सेवाजेष्ठता यादी
(मुळ प्रत मा.विभागीय आयुक्त यांचे स्वाक्षरीत)

(संतोष कवडे)
उप आयुक्त (आस्थापना)
विभागीय आयुक्त कार्यालय,
अमरावती.